

हळबे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. सुभाष सावंत.

# हळबे महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रम

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रातर्फे राबविण्यात येणारा करिअर कट्टा या उपक्रमासाठी विद्यार्थी नोंदणी मोहीम राबविण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी, यासाठी आयएएस आपल्या भेटीला तसेच व्यावसायिक गुण वृद्धिंगत व्हावेत, या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या उद्योजक आपल्या भेटीला हे उपक्रम करियर कट्टामधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी देण्यात येतात. या दोन उपक्रमांत सहभागी होण्यासाठी करिअर कट्टातर्फे रु. ३६५ फी आकारली जाते. या उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांनी करियर करावे यासाठी महाविद्यालयातून ही नोंदणी मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थीदशेत करिअरचे स्वप्न बघणे, त्यासाठी ध्येयनिश्चिती करणे, त्याग करणे आणि प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास स्पर्धा परीक्षेत यशस्वी होता येते, असे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रास्ताविक प्रा. एस. एस. पाडगावकर तर आभार कु. महिमा गवस हिने मानले.